क्र. पोउपा/शवाशा/प्रशा-१/ ५० /२०१३.
पो. उपायुक्त शहर वाहतुक शाखा यांचे कार्यालय,
ठाणे. दि. 22/03/2023.

## —: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

संदर्भ :— मुंब्रा कौसा बाह्यवळण रस्ता प्ररामा — ०४ कि.मी. १३९/२०० ते १३९/८१० रस्त्यावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत.

*****

**ज्याअर्थी,** ठाणे शहर अंतर्गत परिसरातून राज्यांतर्गत व बाहेरील राज्यातून मुंब्रा बायपास मार्गे जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई कडून भिवंडी/नाशिक/गुजरातकडे राज्य महामार्ग क्र. ३ अथवा घोडबंदर रोडने जड–अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात ये–जा होत असते.

२) **ज्याअर्थी,** मुंब्रा बायपास रेतीबंदर जवळील मुंब्रा कौसा बाह्यवळण रस्ता प्र.रा.मा — ४ १३९/२०० ते १३९/८१० मधील आरओबी पुलाची दुरूस्ती व पुलाच्या स्लॅबवर उच्चशक्ती कॉंक्रीटचा ओव्हरले करणे. कळवा वाहतूक उप विभाग हंद्दीत खारेगांव ब्रिजचे मास्टीक पध्दतीने डांबरीकरण व क्षतिग्रस्त एक्सपांशन जॉईटस् दुरूस्ती करणे, तसेच कापूरबावडी वाहतूक उप विभाग हद्दीत साकेत ब्रिजचे मास्टीक पध्दतीने डांबरीकरण व क्षतिग्रस्त एक्सपांशन जॉईट्स दुरूस्ती करणे. सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच एम.एस.आर.डी.सी. विभागामार्फत होणार आहे. सदर कामे सुरू करणार असल्याने सदर मार्गावरील वाहतूक बंद करण्याबाबत कळविले आहे.

३) **ज्याअर्थी,** जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई दक्षिण भारतातून पुणे मार्गे येणाऱ्या व भिवंडी/नाशिक/गुजरात व उत्तर भारतात जाणाऱ्या व येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मुंब्रा बायपास बाह्यवळण रस्ता पूर्णपणे बंद करण्यात येत असल्याने या मार्गावरून येणारी व जाणारी वाहतूक बाधित होणार आहे.

४) **ज्याअर्थी,** मी, **जय जीत सिंह, पोलीस आयुक्त, ठाणे शहर**, महाराष्ट्र शासन गृह विभाग एम.व्ही.ए.११६/सी.आर/३७/टी.आर.दि ०७/०९/११९६ चे अधिसुचनेनुसार मोटर वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करतो की, :—

**प्रवेश बंद —**

४.१) **जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई** कडून येणारी वाहने तसेच दक्षिण भारतातून पुणे मार्गे तळोजा कडून कल्याण फाटा व शिळफाटा मुंब्रा बायपास मार्गे नाशिक गुजरात भिवंडी उत्तर भारतात जाणाऱ्या सर्व प्रकारच्या **वाहनांना मुंब्रा बायपासकडे जाण्यास शिळफाटा येथून पुर्णवेळ प्रतिबंध करण्यात येत आहे.**

४.२) जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई उरण मार्गे महापे सर्कल कडुन शिळफाटा मार्गे गुजरात, भिवंडी जाणाऱ्या सर्व प्रकरच्या वाहनांना **शिळफाटा कडे येण्यास पूर्णपणे प्रतिबंध करण्यात येत आहे.**

CamScanner

**पर्यायी मार्ग –**

अ) कळंबोली – शिळफाटा – येथून डावे वळण घेवून – महापे हॉटेल पोर्टीका सरोवर समोरून वळण घेवून रबाळे एम.आय.डी.सी. मार्गे रबाळे नाका – ऐरोली पटणी सर्कल डावीकडे वळून घेवून ऐरोली सर्कल उजवीकडे वळण घेवून मुलुंड ऐरोली ब्रिज वरून ऐरोली टोलनाका मार्गे उजवीकडे वळण घेवून – पुर्व दुतगती महामार्गे **मुलुंड आनंदनगर टोलनाका वरून – माजीवाडा – घोडबंदर रोडने – गायमुख मार्गे गुजरात दिशेने मार्गस्थ होतील.**

**तसेच भिवंडी कडे जाणारी वाहने**

ब) वरील मार्गाने माजीवाडा – कापुरबावडी सर्कल उजवे वळण घेवून कशेळी – काल्हेर – अंजुर चौक – येथून भिवंडी कडे मार्गस्त होतील.

सदर वाहनांना रात्री २२:०० ते ५:०० दरम्यान प्रवेश देण्यात येत आहे.

क) परंतू वरील मार्गाने कापूरबावडी साकेत ब्रिज तसेच कळवा खारेगाव खाडी ब्रिजचे काम चालू होईपर्यंत भिवंडी शहराकडे येणाऱ्या वाहनांना माजिवडा मार्गे – साकेत ब्रिज – खारेगाव खाडी ब्रिज – माणकोली मार्गे भिवंडी गोडाऊन परिसराकडे जाण्यास दिवसा १२:०० ते १६:०० तसेच रात्रौ २२:०० ते पहाटे ५:०० दरम्यान प्रवेश देण्यात येईल.

**तसेच नाशिकडे जाणारी वाहने**

ड) जे.एन.पी.टी – डी पॉईट – पळस्पे फाटा येथून डावे वळण घेवून – जुना मुंबई पुणे रोडने कोनब्रिज उतरल्यानंतर डावीकडे वळण घेवून – मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाने खालापूर टोलनाका मार्गे **इच्छित स्थळी जातील.**

**नाशिक कडून येणा–या वाहनांना प्रवेश बंद –**

४.३) नाशिक, राष्टीय महामार्ग क्र. ३ वरून जे.एन.पी.टी. नवी मुंबईकडे जाणारे जड–अवजड वाहनांना **'शहापूर'** येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–**

शहापूर येथून राष्टीय महामार्ग क्र. ३ वरून डावीकडे वळून– सापगाव– मुरबाड– कर्जत– चौक फाट– डि पॉईट– जे.एन.पी.टी. नवी मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी **२४ तास (दिवस व रात्रौ) एक दिशा मार्ग (ONE WAY) करण्यात येत आहे.**

४.४) **गुजरात कडून येणा–या वाहनांना प्रवेश बंद –**

राष्टीय महामार्ग क्रमांक ८ – अहमदाबाद, गुजरांत कडुन जे.एन.पी.टी. नवी मुंबई, नाशिक व पुणे मार्गे दक्षिण भारतात जाणारी जड–अवजड वाहनांसाठी मुंब्रा बायपास मार्गे प्रतिबंध करण्यात येत आहे.

CS CamScanner

<u>पर्यायी मार्गे</u> –

अ) मनोर (टेन नाका) येथून डावे वळण घेवून – पोशेरी–पाली – वाडा नाका – शिरीष पाडा येथून डावे वळण घेवून – अबिटघर – कांबरे येथून उजवे वळण घेवून. – पिवळी – केल्हे – दहागाव मार्गे वाशिंद येथून नाशिकच्या दिशेने तसेच भिवंडी करिता जाण्यासाठी **२४ तास (दिवस रात्रौ) एक दिशा मार्ग (ONE WAY) करण्यात येत आहे.**

**ब) भिवंडी शहरातून ठाणे – आनंदनगर चेकनाका मार्गे जे.एन.पी.टी. नवी मुंबई जाण्यास वाहनांना दिवसा १२:०० ते १६: ०० पर्यत तसेच रात्री २२:०० ते ५:०० दरम्यान प्रवेश देण्यात येत आहे.**

क) चिंचोटी मार्गे – अंजुर फाटा, भिवंडी –. जे.एन.पी.टी. नवी मुंबई करीता **रात्रौ २२:०० ते ०५:००** दरम्यान प्रवेश देण्यात येत आहे.

ड) राष्टीय महामार्ग क्रमांक ८ – अहमदाबाद, गुजरात कडून जे.एन.पी.टी. नवी मुंबई, पुणे मार्गे दक्षिण भारतात जाणारी जड–अवजड वाहनांसाठी घोडबंदर मार्गे माजीवाडा – आनंदनगर – ऐरोली नवी मुंबई मार्गे जाण्यास रात्री २२:०० ते ०५:०० दरम्यान प्रवेश देण्यात येत आहे.

५) सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि. ०१/०४/२०२३ पासून काम संपेपर्यंत अंमलात राहील.

६) सदरची वाहतूक अधिसुचना ही मुंब्रा कौसा बाह्यवळण तसेच साकेत ब्रिज तसेच खारेगांव खाडी ब्रिज रस्ता दुरूस्ती करिता माल ने–आण करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही.

७) तसेच अग्निशमन दल, पोलीस, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील हलकी चार चाकी वाहने ही जुना पुणे–मुंबई रोड राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ चा वापर करतील.

८) शिळफाटा ते मुंब्रा रेतीबंदर येथून चार चाकी हलकी वाहने मुंब्रा शहरातून जुन्या पुणे–मुंबई रोडने ये–जा करतील तसेच मुंब्रा शहरामध्ये जीवनावश्यक माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना प्रवेश देण्यात येत आहे.

९) सदरच्या अधिसुचनेचा भंग करणाऱ्या मोटर वाहन चालकाविरूध्द मोटर वाहन कायदा १९८८ कलम १७९(१) अन्वये कारवाई करण्यात येईल.

28-3-23

**(जय जीत सिंह)**
**पोलीस आयुक्त, ठाणे शहर.**

CamScanner

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.

२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना रद्द केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा.सविनय सादर**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे व नवी मुंबई.
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा,ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३ कल्याण, परिमंडळ –४ उल्हासनगर

**प्रत** :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.

२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना रद्द करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner